६८३९

क्र. : माध्य. ३ /१३/ ५ वी ते ७ वी / पुवि / २००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१, यांचे कार्यालय
दिनांक : 17 MAY 2001

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद पुणे

विषय - इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करण्यास परवानगी देणेबाबत.

शाळा : - न्यू इंग्लिश स्कूल, धायरी, पुणे.

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५वी/२०००-२००१ दि. ३०.३.२००१

उपरोक्त विषयाधीन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, सन १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्र. एसएसएन/~~१०८५ / २३४८५ / (२४४ एम)~~ १०९७/[५२८]/९९/ माशि-१, दिनांक ~~२९-१-८६ व २०-१२-८८~~ १.३.९९ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

२/- सदर अधिकारांच्या अधिन राहून, खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर जय शिवराय प्रतिष्ठान पुणे. या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, धायरी, पुणे. या माध्यमिक विद्यालयांत इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरू करण्यास सन ~~१९~~ २००० या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी - १) इ. ५ वी ते ७ वी चे वर्गाची परवानगी ही विनाअनुदान तत्त्वावर राहील.
२) मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३) वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश / नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. शैक्षणिक सोय म्हणून जून २००० पासून मान्यता परंतु अनुदान सूत्रासाठी जून २००१ पासून सदर वर्ग धरावा.

वरीलप्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरू केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीचे वेळी करावी व त्याबाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत.

स्वाक्षरित मा. उ. स. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रत - १) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तारभवन मुंबई ३२, यांना सविनय सादर

२) मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, धायरी, पुणे.

३] निवडनस्ती.

धायरी
स्थलांतर

९९९९८

जा.क्र.माध्य-३/१२/ पुवि/स्थलांतर/ ०३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 12 MAY 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : शाळा स्थलांतरास परवानगी मिळणेबाबत.
न्यू इंग्लिश स्कूल, धायरी ता. हवेली जि. पुणे.

संदर्भ : शासन पत्र क्र. माशास्थ १४०२ १०७/ २००३ माशि-३,
दिनांक ३१.३.२००

जय शिवराय प्रतिष्ठान, पुणे संचलित न्यू इंग्लिश स्कूल, धायरी ता. हवेली जि. पुणे या शाळेचे साते ता. मावळ जि. पुणे या ठिकाणी स्थलांतर करण्यास नेहमीच्या अटींवर तसेच खालील विशेष अटींची पूर्तता करणे शर्तीवर शासनाने वरिल संदर्भिय पत्रान्वये कार्योत्तर परवानगी दिलेली आहे.

१] स्थलांतरीत केलेल्या माध्यमिक शाळेतील कोणत्याही वर्गासाठी कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

२] धायरी ता. हवेली येथील शाळेतील सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरीत केलेल्या साते ता. मावळ या शाळेचे ठिकाणी सामाऊन घेतले जाईल.

३] स्थलांतरीत शाळेसाठी लागणारी आवश्यक भौतिक सुविधा यांची पूर्तता केली जाईल.

४] शासनाचे वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

मूळप्रतिवर शि. उ. सं.
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१. यांचे कार्यालय
12 MAY 2003
९९९९७
जावक नोंदवही क्रमांक

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – १.
दुरध्वनी क. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क. ०२०-२६१२२२१७
संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

जा.क्र. शिऊसं/माध्य-३०२/ शाळा नांव बदल/२०१७/८९
दिनांक : 2 JAN 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय : शाळेच्या नांवात बदल करणेबाबत
न्यू इंग्लिश स्कूल, साते ता.मावळ जि.पुणे
ऐवजी
कै.श्री.नानासाहेब बलकवडे माध्यमिक विदयालय, साते ता. मावळ जि.पुणे

संदर्भ : १. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचे पत्र क्रमांक
जा.क्र.जिप/शिक्षण/माध्य/७४६०/१७ दिनांक २२.११.२०१७
२.मा.अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक
क्र.एसएसएन-१०९६/७४६०/माशि-१, दिनांक ३.१२.१९९८

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यांत येते की, जय शिवराय प्रतिष्ठान,कोथरुड,पुणे या संस्थेच्या दिनांक २.९.२०१७ च्या ठरावा नुसार न्यू इंग्लिश स्कूल, साते ता.मावळ जि.पुणे **ऐवजी** कै.श्री.नानासाहेब बलकवडे माध्यमिक विदयालय, साते ता. मावळ जि.पुणे असा नावांत बदल करण्याचे ठरविले आहे.

| जुने नांव | नवीन नांव |
|---|---|
| **न्यू इंग्लिश स्कूल, साते ता.मावळ जि.पुणे** | **कै.श्री.नानासाहेब बलकवडे माध्यमिक विद्यालय, साते ता. मावळ जि.पुणे** |

संदर्भ क्रमांक २ चे शालेय शिक्षण विभाग,मुंबई यांच्या दिनांक ३.१२.१९९८ चे परिपत्रकानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांच्या कार्यालयाचे दप्तरी नोंद घेण्यात आलेली आहे. सदर नोंद आपल्या कार्यालयाच्या दप्तरी घेण्यांत यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : माहितीस्तव कार्यवाहीसाठी रवाना
सचिव, जय शिवराय प्रतिष्ठान, पंचवटी अपार्टमेंट गल्ली नं.११, परमहंसनगर,कृष्णा कॉलनी, पौड रोड,कोथरुड पुणे-४११०३८ व्दारा मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, साते ता.मावळ जि.पुणे ऐवजी कै.श्री.नानासाहेब बलकवडे माध्यमिक विदयालय, साते ता. मावळ जि.पुणे